// सा विद्या या विमुक्तय //

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड—४३१ ६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325
Website : srtmun.ac.in
e-mail : affi.srtmun@gmail.com

कायम संलग्नीकरणाचे निकष पूर्ण करीत नसलेल्या प्रकरणी शुल्क परतावा बरणे बाबत.

## :: परिपत्रक ::

संदर्भ :— मा. व्यवस्थापन परिषद बैठक ऐनेवळचा विषय क्र. ०४/६२—२०१९, दि. ०४.१०.२०१९.

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्यांना कळविण्यात येते की, अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयातील विषय, अभ्यासक्रम व विद्याशाखांना कायम संलग्नीकरण प्रदान करणेसाठी महाविद्यालये ही विद्यापीठाकडे प्रस्ताव दाखल करतात. परंतु, कांही महाविद्यालये कायम संलग्नीकरणाचे विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठ अधिनियमातील निकष पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांचे प्रस्ताव विद्यापीठाकडून अमान्य केल्या जातात. अशा प्रकरणी महाविद्यालयांकडून कायम संलग्नीकरणाबाबत विद्यापीठास प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेले कायम संलग्नीकरण शुल्क परत करणेबाबत मागणी करण्यात येते. अशा प्रकरणी महाविद्यालयास कायम संलग्नीकरणासंदर्भातील शुल्क परत करणेबाबत संदर्भिय व्यवस्थापन परिषद बैठकीत खालील बाबींना मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

अ) केवळ छाननी करुन अपात्र प्रस्तावास ६० टक्के रक्कम परत करण्यात येईल.

ब) छाननी मध्ये पात्र असलेले व समितीने भेट दिल्यानंतर प्रस्ताव कोणत्याही स्तरावर नामंजूर झाल्यास परतावा शुल्क देय असणार नाही.

क) संबंधित महाविद्यालयास पुन: प्रस्ताव सादर करावयाचा असल्यास कायम संलग्नीकरण शुल्क प्रस्तावासह पुन: सादर करावे लागेल.

कायम संलग्नीकरणाचे निकष पूर्ण करीत नसलेल्या प्रकरणी उपरोक्त बाबीस मा. व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केली असल्यामुळे त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदरचे परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात आले आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड—४३१६०६. )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न—०३/२०१९—२०२०/ 1763 )(
दिनांक :— २३.१०.२०१९. )(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :—

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिनीयर प्रोग्रामर, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.



Scanned by CamScanner